दैनिक हेराल्ड

**DAINIK HERALD**

Date: June 11, 2018 | Edition: Goa | Language: Marathi
Circulation: 50,000 | Page: Online

Headline: U.S. and India to collaborate in ocean exploration

Substance: The second India-US colloquium on Earth Observations and Sciences for Society and Economy called for a greater collaboration between Indian and US scientists, where both the countries (and the larger world) could benefit from the commonly shared insights.

# भारत, अमेरिका करणार एकत्रितरीत्या समुद्र संशोधन

पणजी, दि.११ (प्रतिनिधी) :

समुद्रात वारंवार घडणारे बदल आणि त्याची कारणे शोधून काढण्यासाठी भारत आणि अमेरिका एकत्र संशोधन करणार आहेत. त्याचप्रमाणे मागील काही वर्षांमध्ये जी मााहिती गोळा केली आहे, ती सर्वांसाठी खुली करण्यात येणार आहे, असे भारत आणि अमेरिकेच्या वैज्ञानिकांनी जाहीर केले.



अमेरिकेच्या समुद्री आणि वातावरणीय प्रशासन आणि सीएसआयआर -एनआयओ तसेच पृथ्वी विज्ञान मंत्रालयाचे वैज्ञानिक ११ ते १३ जून गोवा भेटीवर आले आहेत. हवामानाचा अंदाज बांधून पुढील उपाय योजना करण्यासाठी या वैज्ञानिकांची भेट घडवून आणली आहे.

मुख्य वैज्ञानिक क्रेग मॅकलिन, एडजर्ड दी केगन, डॉ. एम. राजीवन आणि एनआयओचे संचालक प्रा. सुनील कुमार यांची यावेळी उपस्थिती होती.

एम. राजीवन यांनी सांगितले, भारत आणि अमेरिका मिळून समुद्री विज्ञान, समुद्री जीवन, पर्यावरण आणि निर्माण होणाऱ्या आपत्कालीन स्थितीवर अभ्यास करत आहे. गेली १० वर्षे हा अभ्यास चालला आहे. यात युवा संशोधकांना देखील सहभागी करून घेतले जाणार आहे.

मॅकलिन म्हणाले की, समुद्रात दरवेळी बदल घडताना दिसतात. बदलत्या समुद्रा विषयी अभ्यास करुन त्याची कारणे शोधून काढायला हवीत. त्यासाठी भारत आणि अमेरिका पुढे आले आहे. दोन्ही देश मिळून समुद्री जीवन व आव्हानांचा अभ्यास करणार आहेत.